क्र.पोमसं/३१/३९-१/घबांअ/२२/२०१८ मुंबई, दि.२४/०४/२०१८

**संदर्भ :-** १) या कार्यालयाचे परिपत्रक आदेश क्र. पोमसं/३१/शासकीय अग्रीम/१८५/२०१६, दि. ०१/०२/२०१७
२) या कार्यालयाची ज्ञापने क्र. पोमसं/३१/३९-१/घबांअ-बँक कर्ज/३८/२०१७, दि. ०७/०७/२०१७
३) या कार्यालयाचे ज्ञापन क्र.पोमसं/३१/३९-१/घबांअ-बँक कर्ज/९३/२०१७, दि. १५/११/२०१७
४) समक्रमांकित परिपत्रकीय आदेश क्र. पोमसं/३१/३९-१/घबांअ-बँक कर्ज/१७/२०१८ दि.०७/०४/२०१८ आणि
५) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/३१/३९-१/घबांअ-बँक कर्ज/१७/२०१८, दि. २०/०४/२०१८

विषय :- **राज्यातील पोलीस दलातील कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिमाकरिता बँकामार्फत कर्ज व्यवस्था करण्याबाबत**

*****

**परिपत्रक :-**

शासन निर्णय, वित्त विभाग क्र. घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम, दि. २०/०२/२०१५ मध्ये नमूद केले आहे की, 'शासकीय कर्मचाऱ्यास मंजूर करण्यात आलेल्या घरबांधणी अग्रीमाच्या प्रथम हप्त्याची रक्कम वितरीत केल्यानंतर संबंधीत कर्मचाऱ्याने कोणत्याही कारणास्तव पुढील अग्रीम न घेता, प्रथम हप्त्यात घेतलेल्या अग्रीमाची रक्कम परत करुन अग्रीम रद्द केल्यास अग्रीम मंजूरीच्या दिनांकास प्रचलित असलेल्या व्याजदराने गणना करुन रक्कम परतीच्या दिनांकापर्यंत व्याजाची वसुली करण्यात यावी. तसेच, सदर अधिकारी / कर्मचारी यांना पुन्हा घरबांधंणी अग्रीम मंजूर करण्यात येऊ नये.' सर्व घटक प्रमुखांना याची जाणीव करुन देण्यात येते की, **एचडीएफसी बँकेकडून ज्या दिवशी घरबांधणी अग्रीमाची रक्कम महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाच्या बँक खात्यामध्ये जमा होईल, त्याच दिवसापासून व्याजाची आकारणी करण्यात येणार आहे.** त्यामुळे अर्जदाराचे अर्ज ऑनलाईन महामंडळाकडे पाठविल्यानंतर तो अर्ज रद्द करणे ऊचित होणार नाही, आणि असे अर्ज रद्द झाल्यास एचडीएफसी बँकेकडून आकारण्यात येणाऱ्या व्याजाचा भुर्दंड शासनावर पडणार आहे, जो योग्य नाही. अशी दंडात्मक वसुली संबंधीत कर्मचाऱ्याकडून केली जाईल यांची कटाक्षाने नोंद घ्यावी.

२. तरी, खालील सर्व घटक प्रमुखांना याव्दारे स्पष्ट सूचना देण्यात येत आहेत की, त्यांनी अर्जदारांशी चर्चा करुनच अर्ज या कार्यालयास सादर करावेत. या कार्यालयास ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतर पुन्हा ते अर्जदाराच्या विनंतीवरुन रद्द केले जाणार नाहीत. **तसेच, फक्त पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचेच अर्ज ऑनलाईन सादर करावेत, असे पुन्हा सूचित करण्यात येत आहे.**

२४/४/१८

**(डॉ. प्रज्ञा सरवदे)**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, मुंबई

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई/बिनतारी संदेश विभाग, पुणे/लोहमार्ग मुंबई/
रा.रा.पो.बल. मुंबई/गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे/नागरी हक्क संरक्षण,मुंबई

सर्व पोलीस आयुक्त, (रेल्वेसह)

संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक

विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर/विशेष सुरक्षा विभाग, दादर/फोर्सवन मुंबई/
मोटार परिवहन पुणे/रा.रा.पो.बल नागपूर / पुणे

पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर

सर्व पोलीस अधीक्षक (रेल्वेसह)

पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश विभाग, पुणे/गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे/अंगुली मुद्रा केंद्र, गु.अ.वि.मुंबई

उपसंचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक

सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये/अ.अ.प्र.के, नागपूर

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ ते १६